RNI No. MAHBIL /2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १२, अंक २४] सोमवार, ऑगस्ट ३, २०२६/श्रावण १२, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ५७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०२६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १०.**—महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यांत आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश. .. .. **पृष्ठे** १-४

**ग्रामविकास विभाग**

बांधकाम भवन २५, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४०० ००१,
दिनांक ३ ऑगस्ट २०२६.

**MAHARASHTRA ORDINANCE No. X OF 2026.**

AN ORDINANCE

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA VILLAGE PANCHAYATS ACT AND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.

**सन २०२६ महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १०.**

**महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यांत आणखी सुधारणा करण्याकरिता अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही;

१९५९ चा ३. १९६२ चा महा. ५. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यांत आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२६, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

प्रकरण दोन

## महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाची सुधारणा

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १०-१क ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, "महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १०-१क मध्ये, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— १९५९ चा ३.

"परंतु तसेच, जर अशी व्यक्ती, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर, परंतु महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२६ च्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये निवडून आलेली असेल, आणि ती व्यक्ती, ज्या दिनांकास निवडून आल्याचे घोषित झाले असेल, त्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास कसूर करील तर, तिची निवड, भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, सदस्य म्हणून राहण्यासाठी अपात्र ठरेल.". २०२६ चा महा. अध्या. १०.

सन १९५९ चा अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ३०-१क ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ३०-१क मध्ये, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु तसेच, जर अशी व्यक्ती, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर, परंतु महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२६ च्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये निवडून आलेली असेल, आणि ती व्यक्ती, ज्या दिनांकास निवडून आल्याचे घोषित झाले असेल, त्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास कसूर करील तर, तिची निवड, भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, सरपंच म्हणून राहण्यासाठी अपात्र ठरेल.". २०२६ चा महा. अध्या. १०

प्रकरण तीन

## महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ याची सुधारणा

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १२क ची सुधारणा.

**४.** महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (यात यापुढे, या प्रकरणात, ज्याचा निर्देश, "महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम १२क मध्ये, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— १९६२ चा महा. ५.

"परंतु तसेच, जर अशी व्यक्ती, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर, परंतु महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२६ च्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये निवडून आलेली असेल, आणि ती व्यक्ती, ज्या दिनांकास निवडून आल्याचे घोषित झाले असेल, त्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास कसूर करील तर, तिची निवड, भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, परिषद सदस्य म्हणून राहण्यासाठी अपात्र ठरेल.". २०२६ चा महा. अध्या. १०

**५.** महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियमाच्या कलम ४२ मधील, पोट-कलम (६क) मध्ये, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ४२ ची सुधारणा.

"परंतु तसेच, जर अशी व्यक्ती, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर, परंतु महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२६ च्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये निवडून आलेली असेल, आणि ती व्यक्ती, ज्या दिनांकास निवडून आल्याचे घोषित झाले असेल, त्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास कसूर करील तर, तिची निवड, भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, अध्यक्ष म्हणून राहण्यासाठी अपात्र ठरेल.". २०२६ चा महा. अध्या. १०.

**६.** महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियमाच्या कलम ६७ मधील, पोट-कलम (७क) मध्ये दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम ६७ ची सुधारणा.

"परंतु तसेच, जर अशी व्यक्ती, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी किंवा त्यानंतर, परंतु महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या (सुधारणा) अध्यादेश, २०२६ च्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी झालेल्या निवडणुकांमध्ये निवडून आलेली असेल, आणि ती व्यक्ती, ज्या दिनांकास निवडून आल्याचे घोषित झाले असेल, त्या दिनांकापासून बारा महिन्यांच्या कालावधीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास कसूर करील तर, तिची निवड, भूतलक्षी प्रभावाने रद्द करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि ती, सभापती म्हणून राहण्यासाठी अपात्र ठरेल.". २०२६ चा महा. अध्या. १०.

## निवेदन

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम (१९५९ चा ३) याची कलमे १०-१क व ३०-१क, आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. ५) याची कलमे १२क, ४२ व ६७ यांमध्ये अशी तरतूद आहे की, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, किंवा यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांमधील व्यक्तींकरिता राखीव असलेल्या, ग्रामपंचायत सदस्य व सरपंच, जिल्हा परिषदांचे परिषद सदस्य व अध्यक्ष, आणि पंचायत समित्यांचे सभापती या जागेची निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेली प्रत्येक व्यक्ती, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र, नामनिर्देशन पत्रासोबत सादर करील.

२. वर निर्देशित केलेल्या कलमांच्या परंतुकांन्वये, राखीव असलेल्या जागांकरिता निवडणूक लढविण्यासाठी उमेदवारांना नामनिर्देशनपत्रासोबत, त्यांनी वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी पडताळणी समितीकडे दाखल केलेल्या अर्जाची प्रत किंवा त्याचा अन्य कोणताही पुरावा; आणि पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र त्याच्या निवडणुकीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत तो सादर करील, असे हमीपत्र सादर करण्याची परवानगी दिलेली आहे. असे वैधता प्रमाणपत्र विनिर्दिष्ट केलेल्या सहा महिन्यांच्या कालावधीत सादर करण्यात कसूर केल्याच्या परिणामी, अशा व्यक्तींची निवडणूक भूतलक्षी प्रभावाने रद्द होते आणि सदस्य, सरपंच, परिषद सदस्य, अध्यक्ष, किंवा यथास्थिति सभापती यांचे पद धारण करण्यास अपात्र ठरते.

३. डिसेंबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या महिन्यांमध्ये नगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या एकाच वेळी मोठ्या प्रमाणात निवडणुका घेण्यात आलेल्या असल्यामुळे, पडताळणी समित्यांवर जात प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याच्या आणि वैधता प्रमाणपत्रे देण्याच्या कामाचा अतिभार आलेला आहे. यामुळे, अशा निवडणुकांमध्ये निवडून आलेल्या उमेदवारांना विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत जात प्रमाणपत्रे मिळविण्यात अडचणींना सामोरे जावे लागत आहे. म्हणून, निवडून आलेले सदस्य, सरपंच, परिषद सदस्य, अध्यक्ष आणि सभापती यांना, त्यांचे अर्ज पडताळणी समितीकडे प्रलंबित असल्यामुळे, अद्यापही वैधता प्रमाणपत्र प्राप्त करावयाचे आहेत, ते विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेच्या आत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी अपात्र ठरणार नाहीत, याची सुनिश्चिती करणे आवश्यक आहे. म्हणून, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यांत सुयोग्य सुधारणा करून, अशा निवडणुकांमध्ये, असे निवडून आलेले सदस्य, सरपंच, परिषद सदस्य, अध्यक्ष आणि सभापती यांना वैधता प्रमाणपत्रे सादर करण्यासाठी आणखी सहा महिन्यांचा कालावधी वाढवून देण्याची तरतूद करणे इष्ट आहे, असे वाटते.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे; म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक ३१ जुलै २०२६.

**जिष्णु देव वर्मा,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार,**
शासनाचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.